जा.क्र.:माध्य-३/प्रथम मान्यता/पुणे विभाग/१९९४

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे - १. यांचे कार्यालय.

दिनांक : 24 MAR 1994

प्रति,

शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद, ----पुणे----.

<u>विषय</u> - प्रथम मान्यता

**जोगेश्वरी विद्या. कांदलगांव ,ता. इंदापूर**

संदर्भ - आपले पत्र जा. क्र. **शिक्षण /माध्य/इ-४/प्रमा/९३-९४**
**दि. २५. १. ९४**

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३ अन्वये ~~गोपाळ भोपळे वाचनालय, कांदलगाव~~ ---------------- संस्थेच्या ~~मराठी~~ ------- माध्यमिक शाळेच्या इ. ८वी/ ९वी /१०वी च्या वर्गास सन १९९३ - १९ ९४ या शैक्षणिक वर्षासाठी जुन १९९३ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठविताना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावा सोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थने मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित वर्ग उपलब्ध करुन द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करुन द्यावी.
८] वाढीव फीचे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कडून मंजूर करुन घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून अद्यावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३] **चित्रकला व क्रीडा या विषयासाठी शिक्षक नेमण्यात यावेत.**
१४] **अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा उपयोग असावा.**

प्रत :- **मुख्याध्यापक ,**
**जोगेश्वरी विद्या. कांदलगांव ता. इंदापूर**

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे - १.

'27'

दाखल दिनांक २१४१९४